## मधुकर सोनवणे

# कठोपनिषद



# कठोपनिषद

## मधुकर वि. सोनवणे

# कठोपनिषद

मधुकर वि. सोनवणे

20, विजय नगर कॉलनी
नवा आडगाव नाका पंचवटी नाशिक-3
422003
फ़ोन: ९४२२७५६३३३

**msonavane@hotmail.com**

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून
आपण हे कायदेशीररित्या
कोणालाही विनामूल्य पाठवू
शकता.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com


www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ६ मे २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अल्प परिचय

अल्प परिचय

मी मधुकर वि. सोनवणे.

रेल्वेत ३६ वर्षे अनेक भूमिका निभावत शेवटी कोंकण रेल्वेत डेप्युटी चीफ इंजिनीअर म्हणून सेवा निवृत्त झालो.

जीवनाच्या या ८२ वर्षीच्या प्रवासात लहानपणा पासून अनेक व्यक्तीचा सत्संग झाला. ही माऊलीची कृपा.

ज्ञानेश्वर माउली स्वये अंतरी बसून मला नित्य मार्गदर्शन करीत आहे. हे लेखन त्यांचाच कृपा प्रसाद.

मृत्यू हा नेहमीच अनाकलनीय राहिला. त्याचा खरा अर्थ कठोपनिषद या श्रुतीत उमगला.

लहानपणी सहा वर्षाचा असतांना नांदगावला [नाशिक] पहिला मृत्यू पहिला. त्यांचा नेमका अर्थ तेथील देवीच्या देवळातील पूजा करणाऱ्या वृद्ध भक्तीणीने मला देवीच्या समोर नेऊन सांगितला. देवीच्या डोळ्यांत पाहून तिला नमस्कार करण्यास सांगितले. डोळे मिटून देवीच्या जवळ बसलो. त्यावेळी ती जगदंबा माझ्याशी बरेच कांही सांगत होती. आज सुद्धा मला ते आठवते.

माझ्या अंतरीची दृष्टी त्या जगन्मातेने उजळ केली. आणि मी निर्भय झालो.

सामान्य जनांना उपनिषदे वाचणे वा समजून घेणे हे सहसा जमत नाही. म्हणून या उपनिषदाचे सुलभ काव्यमय भाष्य करण्याचा हा यत्न आहे.

मानवी जीवन एकदाच लाभते, त्याचे सार्थक व्हावे यासाठी हे बहुमोल उपनिषद वेळ काढून समजून घ्यावे ही अपेक्षा

सुदैवाने ई साहित्य प्रतिष्ठान सारखे लोकप्रिय व्यासपीठ असल्याने ही रचना सर्वदूर जाऊन सुलभतेने उपलब्ध होईल ही खात्री आहे.

या रचनेला काव्याच्या  नियमाच्या चष्म्यातून न बघता, आशय उमगून उणे असल्यास पूर्तता अपेक्षितो.

आपल्या सूचना व मार्गदर्शन मला अति बहुमोल असणार.

**अण्णा**

०५/०५/२०२१.

नाशिक-पंचवटी {942275633}

msonavane@hotmail.com

annasonavane02@gmail.com

# अर्पणपत्रिका

## माझे मामा श्री वसंतराव त्र्यंबक निकुंभ



(जन्म ६ सप्टेंबर १९१९- निर्वाण-२२/०७/ २००१)

प्रिय ती. मामा,

आपल्या वडिलांना मृत्यूशी प्रत्यक्ष बोलता आले. आपण विनोबा भावे आणि साने गुरुजींच्या सहवासात राहून अध्यात्मिक मार्गाने जीवन घालविलेत. मला अध्यात्माचा खरा अर्थ शिकविला.

आपण इच्छामरणी होता. आणि आपल्यापासून मिळालेल्या ज्ञानाने मला मृत्यूचे बहुमोल ज्ञान झाले. मरणाचे भय तर गेलेच, शिवाय आपल्या पासून मृत्यूचा खरा अर्थ मला उमगला. भौतिक देह सोडल्यावर माझ्या स्वप्नात येऊन मला मृत्यूनंतरच्या प्रवासाचे आपण मार्गदर्शन केलेत. आज मी जेथे जसा आहे, ते आपल्यामुळे.

आज या विषयावर नचिकेताला यमदेवाने दिलेल्या बहुमोल ज्ञानावर आधारित कठोपनिषद काव्यमय भाष्याद्वारा ई साहित्य प्रतिष्ठान या सुपरिचित प्रसिद्ध माध्यमातून प्रकाशनाचा सुयोग आला आहे.

ही रचना मी आपल्याच स्मृतीला अर्पण करतो.

अण्णा

{मधुकर वि.सोनवणे}

# काव्यमय कठोपनिषद

## मनोगत

दहा प्रमुख उपनिषदातले एक, असे हे महत्वपूर्ण उपनिषद आहे. त्यावरची अनेक भाष्ये वाचलीत, परंतु 'कल्याण' च्या उपनिषद अंकातील भाष्य मनाला भावले. या उपनिषदाचा आस्वाद सहजी घेता येऊन, मृत्यूचा खरा अर्थ उमगावा आणि याचि देही, आपल्या निजरुपाची अनुभूती होणे सुलभ व्हावे, हा रचनाकारांचा पुण्यमय हेतू आहे. हे परम ज्ञान सुलभतेने ग्रहण व्हावे, यासाठी काव्यात उतरविण्याचा हा यत्न आहे.

हे परम ज्ञान होणे, हाच इहलोकी जन्म घेण्याच्या मागचा परम दयाळू भगवंतांचा हेतू आहे. म्हणून हे ज्ञान या उपनिषदाद्वारा ऋषींच्या करवी त्या लीलाधराने आपल्याला उपलब्ध करविले.

याचे काव्यात्मक आकलन सुलभ व्हावे हा प्रयास केलेला आहे. माऊलीच्या आशीर्वादाने हे शक्य झाले. नुसते वाचन न करता, त्यातील आशय अनुभवणे हाच हेतू या लेखनामागे आहे. जे थोडे दिवस उरले आहेत, त्यांत ही सेवा माऊलीने मजकारवी करवून घेतली आहे. यातील व्याकरण न बघता, आशय पहावा, ही विनंती.

अण्णा {मधुकर वि. सोनवणे.}

गुढीपाडवा -१३/०४/२०२१.

annasonavane02 @gmail.com .

msonavane@hotmail.com {9422756333} नाशिक-पंचवटी



श्री कठोपनिषद [ कृष्ण यजुर्वेद}

नामे वाजश्रवस असे जो, गौतम कुळीचा जन्म असे |
पुत्र तयाचा षोडश वर्षा, दान पित्याचे पाहतसे || १.

दानी देई ऐसे गोधन, जे की, वृद्धचि गाईंचे |
दंतविहीन नि भाकड साऱ्या, ओझे जणु घेणाराचे || २.

साऱ्या गाई पुरत्या थकल्या, मंद चालीने चालतसे |
नचिकेताला विस्मय वाटे, ऐशा दानी पुण्य कसे ?|| ३.

पुसे पित्याला सर्वस्वाच्या, दानी मीही तुझ्या असे |
दान कुणाला मजला देणे, योजियले तंव मनी कसे?|| ४.

पुन्हा पुन्हा हे पुसता पुत्रे, चिडुनी त्यासि पिता वदला |
तुजला दानी देण्यास्तव मी, योजियले यमदेवाला || ५.

शब्द निघुनिया गेले त्याचे, दुःखी जाहला परी मनी |
पुत्र सांगतो निश्चित पाळीन, परंपरा मी तंव वचनी || ६.

नकोच चिंता, पाळीन शब्दा, चुके न कधी ते होणारे |
आशीर्वाद द्या, यमगृही जाण्या, नमुनी निघाला बहु त्वरे || ७.

नचिकेता जाता यमसदनी, समजे गृही यमराज नसे |
निवांत थांबे तो बाहेरी, करित प्रतिक्षा, तेथं बसे || ८.

अन्न न पाणी कांही घेई, कारण माझा मी न असे |
स्वामी येतील तोवरी निश्चल, विचल मनी तो कदा नसे || ९.

यमराजा आले ते सदनी, तीन दिनांनी परतोनी |
बघुनि अतिथी, परि उपवाशी, दुःखित झाले बहु मनी || १०.

जलपानाशी करूनि तेधवा, नमस्कार त्यांनी केला |
निर्जल, आपण तीन दिनाचे, मागा तीन वरास मला || ११.

क्षोभ पित्याचा जावो ऐसे, मागितले ते प्रथम वरे |
पुन्हा परतता, वात्सल्याने वर्तावे मज स्नेहभरे || १२.

म्हणे तथास्तु नचिकेताला, यमराजाने आश्वशिले |
उभयांचेही सुखमय जीवन, ऐसेही वरदान दिले || १३.

स्वर्ग लाभण्या यज्ञविधीचे, विधी विचारी दुज्या वरे |
पूर्ण ज्ञान ते तयास दिधले, यमदेवाने हर्षभरे || १४.

यज्ञ विधी हा तुझिया नामे, जाणतील रे नचिकेता |
नाम तुझे त्या राहील निगडीत, तिसरा वर मागी आता || १५.

वंदन करुनी म्हणे युवक तो, धन्य जाहलो, मी देवा |
आपुल्या सत्संगेचि लाभला, ज्ञानाचा हा मज ठेवा || १६.

यमा नमुनिया पुसे तयाला, देवा मजला सांगावे |
मृत्यू देवता आहांत आपण, रहस्य उकलुनिया द्यावे || १७.

शंका ऐसी जनी मानसी, मृत्यू कुणाला तो येता |
आत्मा जातो किंवा राही, सांगावे हे मज आता || १८.

सोडुनि देहाला जातांना, काय होतसे आत्म्याचे |
कुणी म्हणती हा देह सोडिला, मरण नसे अस्तित्वाचे || १९.

परि कुणी म्हणती, सर्व संपले, येणे जाणे ना त्याचे |
मृत्यू हा तर पुरता शेवट, होईल येणे त्या कैचे ?|| २०.

संभ्रम ऐसा असे मानसी, आपण ज्ञाते विषयाचे |
आत्मतत्व ते समजुन सांगा, मिटेल तम अज्ञानाचे || २१.

विस्मय यमदेवाला वाटे, बालक यौवनी हा असता |
ना मागे हा विलास अथवा, भोग बहु या जगी असता || २२.

वर तिसरा हा असा मागता, उत्तरले यमराज असे |
गूढ नाकळे देवांनाही, दुसरे कांही माग कसे || २३.

नम्र होऊनि बालक वदला, दुजे नको मजला कांही |
आपणाविना अधिकारी ना, ज्ञान दुज्या ठाऊक नाही || २४.

देवांनाही असता संभ्रम, दुजा न कुणी या अधिकारी |
दैवे प्रसन्न आपण असता, कृपया देवा, बोध करी || २५.

नचिकेताचे वळविण्यास मन, यमदेवाने सांगितले |
बाळा ऐके, शेवटचा वर, भौतिक कांही माग भले || २६.

ज्ञान जाणुनि कशास ऐसे?, दीर्घायुष्या तुज देतो |
राज्य पृथ्वीचे, युवती सुंदर, वैभवशाली तुज करितो || २७.

मृत्युलोकी जे दुर्लभ वाटे, माग पाहिजे ते देतो |
खुशाल देईन सारे तुजला, ना मागी परि तूं वर तो || २८.

विनम्र होऊनि नचिकेता तो, वंदन करी यमराजाला |
भोग भोगुनी सुखी ना कोणी, दुःखचि अंती वाट्याला || २९.

भोग भोगिता क्षणिक सुखाचे, तृप्ती कुणाला ना झाली |
तेज जातसे, धर्म हरतसे, हांवेची झोळी खाली || ३०.

जेही लाभे या इहलोकी, कधि ना कधी ते जात असे |
भोगानंदी सुख ते क्षणिकचि, अंती दुःख परि त्यांत वसे ||३१

भाग्यचि माझे संग आपुला, दिव्यची दर्शन मज झाले |
निश्चिंतची मी तये जीवनी, सत्संगे मम मन भरले || ३२.

मृत्यूवरती शासन आपुले, मरणाची मज ना चिंता |
अस्तित्वाचे गुह्य ऐकूदे, हीच विनंती तुज आता || ३३.

देह लाभता, जरा व्याधी त्या, येती त्याचिया संगे |
विषयी दुःखचि सदा ठेविले, जोही त्यामाजी दंगे || ३४.

म्हणुनी प्रार्थितो आत्मज्ञान चि आपुल्या वदने ऐकावे |
भाग्ये अधिकारीचि त्यांतले, घेईन श्रवणी मी भावे || ३५.

## द्वितीय वल्ली

मनी यमाच्या ये संतुष्टी, म्हणे पात्र हा ऐकाया |
क्षणिक भोग ते त्याज्यचि याला, जाणे ही सारी माया || ३६.

ऐक बालका, मृत्युलोकी या, दुर्लभ नरदेहाची प्राप्ती |
जया कळे हे मुक्ती द्वारचि, लोभी तया ना आसक्ती || ३७.

मानव जन्म न भोगासाठी, हांव नको फल लाभाची |
श्रेयस आणि प्रेयस ऐसी, दोन साधने सौख्याची || ३८.

श्रेयस्कर हे ऐसे साधन, दुःख सर्वदा दूर करी |
कल्याणाच्या पंथी सदा तो, मोहाते दूरची सारी || ३९.

मार्गी असे या पूर्ण विरक्ती, भौतिक सौख्या तो टाळी |
लक्ष एकची, हरीप्राप्तीचे, संयम पुरता तो पाळी || ४०.

आवश्यक ते देहा देई, लाड तयाचे ना पुरवी |
नसे कामना कांही अंतरी, शुद्ध मनाला तो ठेवी || ४१.

परि ज्या आवड प्रिय गोष्टींची, स्त्री पुत्र धन मानाची |
इह-लोकी नि स्वर्गामध्ये, इच्छा विषयानंदाची || ४२.

हे लाभे मज, तेही हवेची, संग्रह नि स्वामित्वाची |
एक लाभता, धाव दुज्यास्तव, गळकी झोळी हांवेची ||४३.

प्रेयस ज्याला सदा आवडे, बंधनात तो तये पडे |
वन्ही सम तो सदा भुकेला, धावे त्यास्तव चोहीकडे || ४४.

या जन्मी जो येई तो तर, द्वारी प्रभूच्या उभा असे |
एक बाजूला विपुल भोग जे, क्षणात विरती आपैसे || ४५.

दुज्या बाजूला पूर्ण विरक्ती, नसे कामना कांही मनी |
क्षण आताचा निर्णय घेण्या, पुढे आवडी या दोन्ही || ४६.

पुढल्या श्वासाची ना खात्री, पात्र न माहित कधी फुटे |
म्हणुनी सत्वर निर्णय घेणे, देहा अवधी असे कुठे ?|| ४७.

बहुतांशी परि प्रेयस इच्छी, श्रेयस विरळाशी आवडे |
प्रेयस आवडे बंधनात तो, भवचक्रची येणे निवडे || ४८.

मी देता तुज अमाप वैभव, दीर्घ असे आयुष्य तुला |
भौतिक सारी सुखे वराने, परी न भुललाशी त्याला || ४९.

सुंदर तरुणी, हत्ती घोडे, धन नि संपदा यापुढती |
दिव्य ज्ञान तूं, श्रेष्ठचि गणिले, असे विवेकी तुझी मती || ५०.

अधिकारी तूं ज्ञान स्वीकारा, म्हणुनी कथित असे तुजला |
श्रेष्ठ ज्ञान हे पारखल्याविण, नयेचि द्यावे कोणाला || ५१.

विद्या आणि अविद्या ऐशा, दोन ख्यात जगतात असे |
फल उभयांचे असे वेगळे, जैशी निवड फलहि तसे || ५२.

भौतिक भोगांची आसक्ती, जये अविद्या पथ धरिला |
पूर्ण विरक्ती विद्यामार्गी, अंती शाश्वत सौख्याला || ५३.

भुलविती अंधचि विषय सुखाशी, अन्य अंध त्या अनुसरती |
जमीन, जुमला, कीर्ति, मान या, माजि गुंतुनिया जाती || ५४.

जगी लाभले उत्तम पद नि, मान प्रतिष्ठा हे सारे |
तरिही धावती अजुनि मिळाया, लाभ तयांना नित अपुरे || ५५.

जेही त्या अधिकार लाभले, करुनी दुरुपयोग त्यांचा |
कर्तव्याला विसरुनि जाती, स्वार्थी वापर सत्तेचा || ५६.

जनहित सोडुनि, बेलगाम ते, असुरी संपदा जोडियती |
नीच कर्म हि सहजी करिती, नसे तया लज्जा, भीति || ५७.

माझी करणी कुणी न पाहते, वाढे दुष्कर्मांची गती |
विरोध मजला कुणा शक्य ना, ऐसी होई भ्रष्ट मती || ५८.

पुरते विसरुनि जाती ईश्वरा, चराचरी जो व्यापियला |
सकलांचा आधार असे जो, सहजी विसरती ते त्याला || ५९.

असे नराधम वरुनी सभ्य ते, नचिकेता रे बहु जगती |
कुठे थांबणे तया कळेना, नरकावर त्यांची प्रीति || ६०.

पुन्हापुन्हा ते विषय सुखचि, लाभाया ते धडपडती |
आसक्ती नि कर्मफलांच्या, योगे नरजन्मा व्यतिती || ६१.

अतृप्ती नि फल भोगांच्या, साठी घेती जन्म पुन्हा |
पुन्हा त्याचि त्या चक्री अडकता, भोग भोगिती ते नाना || ६२.

दुर्लभ ऐसा जन्म मानवी, शाश्वत जेणे सौख्य मिळे |
भोगे मातीमोलचि जीवन, हे भोग्यांना मुळि न कळे || ६३.

जरि स्वर्गीचे भोग लाभले, जोवरी पुण्याचा साठा |
पुण्य संपता पुन्हा चालणे, मृत्युलोकिच्याची वाटा || ६४.

अनित्य कैसे नित्य लाभवी?, लाभतसे तेहि फसवे |
इथले सारे महाल नि धन, सोडुनिया लागे जावे || ६५.

वरुनी मानव अंतरी पशु ते, जेंव्हा काळचि फिरत असे |
एक एक ते पाप तयांचे, जगताच्या दृष्टीस दिसे || ६६.

दुष्कर्मांना फुटते वाचा, सावलीही परकी होई |
इथेच नरका ते अनुभवती, क्षण क्षण दुःखातची जाई || ६७.

प्रेयस ऐसे टाळिती विरळा, तूं परि त्या भुलला नाही |
पूर्ण पात्र तूं ज्ञान ऐकण्या, शाश्वत सौख्या जे देई || ६८.

या जगती गोळा जे केले, खोपे जणु ते वाळूचे |
मायावी भोगाच्या साठी, अमुल्य जीवन कां वेचे ?|| ६९.

विवेक अंतरी सदा उजळ ते, श्रेयस्कर मिळण्यासाठी |
क्षुद्र भोग ना भुलविती त्यांना, साह्य त्या करी जगजेठी || ७०.

अशी न जागा जेथं ना हरी, हृदयी सर्वांच्याचि असे |
देत प्रेरणा अंतरातुनि, ज्ञानी तैसा वर्ततसे || ७१.

शुद्ध मतीचे जेही विवेकी, त्यास न गोडी प्रेयसची |
पूर्ण विरक्ती त्यांचे ठायी, ओढ असे त्या श्रेयसची || ७२.

अध्यात्माचे हितकर ऐसे, ज्ञान लाभता ऐकावे |
चिंतन त्याचे खोल करुनिया, जगी सुपंथे आचरावे || ७३.

उघडती द्वारे परमधामची, ऐशास्तव ती नचिकेता |
जन्मा येउनी धन्यचि केले, समाधान श्री हरी चित्ता || ७४.

नचिकेता विनवी यमदेवा, पुण्ययोग सत्संगाचा |
शाश्वत धर्मा आपण जाणता, मार्गही तो कैवल्याचा || ७५.

त्या मार्गावर कैसे जावे, देवा मजला सांगावे |
धर्म-अधर्माच्याहि पैल ते, ज्ञान प्रभू श्रवणी यावे || ७६.

यमदेवाला आनंद झाला, सुपात्र श्रवणाशी श्रोता |
ब्रह्मप्राप्ती हे लक्ष एकची, मानव जन्मी, नचिकेता || ७७.

ब्रह्मप्राप्तीस्तव ॐकाराचे, नाद नि कंपन अनुभविता |
सहजी नीरव शांती लाभे, स्वये ब्रह्मचि ये हाता || ७८.

नच अक्षर ॐकार म्हणावे, आवाहन हे ब्रह्माला |
गूढ अगम्यचि तत्व असे जे, सहजी प्रतिसादी त्याला || ७९.

शुद्ध मनाने हे उच्चारण, जागृत करिते श्री हरीला |
अंतरीचा गोविंद स्वयेचि, तेणे येई प्रतीतीला || ८०.

नचिकेता, मी अमुक ऐशी, स्फुरणा अंतरी होत असे |
तीच जाण त्या परब्रह्माची, गीतेत देवची सांगतसे || ८१.

होणे-जाणे नसेची त्याला, कशात कधी ना गुंततसे ||
त्याच्या संकल्पेचि नुसत्या, अखिल विश्व हे भ्रामतसे || ८२.

लोहचुंबकी सहजी प्रेरणा, लोही स्फुरद्रुप होत जसे |
ब्रह्माच्या केवळ अस्तित्वे, सकल विश्व चळे तैसे || ८३.

सूर्य चंद्र नि इवली मुंगी, आपआपुले कार्ये करी |
सारी ही त्याचीच प्रेरणा, कणाकणा व्यापितो हरी || ८४.

त्याला नाही शत्रू मित्रता, कुणासही ते ना मारी |
तैसे त्या कुणि मारु शकेना, शाश्वत नित्यचि असे हरी || ८५.

निराकार, नि निर्गुण ब्रह्मचि, स्वये तूंचि ते नचिकेता |
ज्ञानदृष्टीने निजरूप पाही, जेणे जीवन सार्थकता || ८६.

तूं देहाला आधार केवळ, करण्या कार्ये जगताची |
तूं न देह परि, नकोच गुंतू, ठेवी आठवण स्व- रुपाची || ८७.

दोन दिनांचा इथे पाहुणा, कशात ना कधी गुंतावे |
कशाचीहि जरि होत आसक्ती, निश्चित बंधन ते व्हावे || ८८.

अलिप्त राहुनि, करि निष्ठेने, नित्यचि या नियमा पाळी |
मायाजाली कधी न गुंतता, जन्म मरण ना ये भाळी || ८९.

वसे ब्रह्म ते सकलांच्याही, गुंफे माजी हृदयाच्या |
सूक्ष्माहूनहि अति सूक्ष्म ते, उतरे जाणीवी प्रतीतीच्या || ९०.

परमात्मा तो अचिंत्य शक्ती, उमजती ना त्याचिया लीला |
त्याची करणी तोचि जाणे, वाव न तेथे तर्काला || ९१.

कधी कुणाला बनवी राजा, सारी ऐश्वर्ये देई |
क्षणात येई कुणी रस्त्यावर, नसे भरवसा कोणाही || ९२.

अज्ञान्याला दूर वाटतो, परि भक्ताला अति जवळी |
एक प्रार्थना त्याची स्फुरता, तत्क्षणी ये विपरित काळी || ९३.

भक्त जाणतो, आज असे ते, नसेचि दिसणे कधी पुन्हा |
अंधाराची रात्र संपते, भास्कर येता तो गगना || ९४.

भक्ताला ना कसली चिंता, हरी अंतरी नित्य असे |
जगन्नाथ पाठीशी असता, वाटे भय ते त्या कैसे ?|| ९५.

श्रीहरी अनुभुती कदा न होई, प्रवचन अथवा तर्कांने |
येथे पोपट ज्ञान फोल ते, ना बुद्धी वा श्रवणाने || ९६.

आंत नि बाहेरीहि शुद्ध जो, श्रद्धावंतचि वैरागी |
स्वये त्यासी ये प्रतीतीला जो, अंत:संगी बहिस्त्यागी || ९७.

जो न गुंतला भोगामाजी, स्वधर्म आचरी निष्ठेने |
त्यास सहजी होई अनुभूती, दिसे न तो, त्या अनुभवणे || ९८.

कर्मकांड वा बाह्य साधने, नच क्लेशही ते देहाला |
कीर्तिस्तव कुणी करी देखावा, हेतू समजे श्री हरीला || ९९.

मन बुद्धी करि हरीला अर्पण, हात तयाचा ना सोडी |
नित्यचि जीवनी, आश्रय त्याचा, संसाराची ना गोडी || १००.

जेही जैसे वाट्या येई, इच्छा तीचि श्रीहरीची |
श्रद्धेने सारेचि स्वीकारी, नसेचि चिंता देहाची || १०१.

जीवन रथ भगवंता हाती, सारी काळजी ती त्याला |
पूर्ण तयाचा पाठीराखा, कधी न सोडी देवाला || १०२.

त्याचा योगक्षेम चालवी, स्वये श्रीहरी प्रेमाने |
भक्त असा तो नित संतोषी, जीवनांत त्या कधि न उणे || १०३.

लोभ आसुरी संपत्तीचा, देव धर्म जो ना मानी |
पेरी बाभूळ येता कांटे, शरण तरि ना हरीचरणी || १०४.

ऐसे अवनत जीवन ज्यांचे, जगजेठी त्या कधि न कळे |
जन्म जन्मी तो भ्रमतची राही, सौख्य तयाला कसे मिळे?|| १०५.

दिसते जगती, आसुरी वृत्ती, कधि न कधी ती फळ देई |
गेले मोठे आणि सानही, हाती न घेउनिया कांही || १०६.

जगा जिंकुनी श्रेष्ठ असे जे, आणि भिकारीही गेले |
ज्ञानी अज्ञानीही गेले, चिरंजीव ना कुणी झाले || १०७.

मोठे मोठे जेही जगती, खात काळ त्या जशी चटणी |
वेळ जयाची भरली तेंव्हां, देह जातसे त्याच क्षणी || १०८.

म्हणुनी त्याचे स्मरण नित्यची, सन्मार्गा न सोडावे |
जे होईल ते सुखे पहावे, अविचल कधीही ना व्हावे || १०९.

म्हणुनि धावती ते अज्ञानी, भक्ता ना त्याची चिंता |
जेंव्हा येईल मरण समोरी, देह त्यागी खेद न चित्ता ||११०.

## तृतीय वल्ली

नवीन देही जीव नि शिव ही, संगे आणिती कर्म फले |
बुद्धी गुहेतचि तया ठेवुनी, भोगास्तव त्या योजियले || १११.

जे देहाने भोगायाचे, जीव होतसे सहभागी |
शिव पाही ते सारे दुरुनी, अलिप्त राही नि:संगी || ११२.

जीव मग्न तो फळे भोगण्या, शिव सद्बुद्धीने पाहतसे |
शिव ही प्रेरणा हृदय गुफेतील, सदैव सत्पथ दावितसे || ११३.

संसाराच्या सिंधू मधुनी, झडकरी आम्हा पार करी |
परब्रह्म पुरुषोत्तम यांशी, समरसण्या व्हा साह्यकरी || ११४.

सत्कर्मास्तव सहजी होवो, ओढ आमुच्या अंतरीची |
नित्य प्रार्थना हीचि हरीला, वाटचाल कैवल्याची || ११५.

साधुभाव नि सद्भावाने स्वकर्म यज्ञा आचरणे |
हाचि होईल सेतू नचिकेता, स्वये आपणा उद्धरणे || ११६.

या उपदेशा, यमराजाने, मनावरी ते बिंबविले |
उजळे अंतर्मन ते त्याचे, यमास वंदन ते केले || ११७.

जीव रूपाने आत्मारामचि, देहाच्या या रथी बसला |
लगाम मनीचे बुद्धी हाती, तयार ती सारथ्याला || ११८.

दहा इंद्रियांचेचि अश्व ते, विषयपथावरी रथ धावे |
जीवात्मा तो प्रवास करितो, सारे त्याने भोगावे || ११९.

भगवंता दे उचित प्रेरणा, बुद्धीला सारथ्याची |
सदैव सन्मार्गे रथ जावो, चरणी प्रार्थना ही आमुची || १२०.

विवेकीच ती बुद्धी सारथी, आज्ञाकारी स्वामींची |
संयमात ते अश्वची ठेवी, नसे चटक ती विषयांची || १२१.

विषयांचे बहु गवत बाजूला, आणि खड्डे मोहाचे |
अश्व नियंत्रित, मार्ग सुयोजित, उत्तम नियमन बुद्धीचे || १२२.

आणि अश्वहि उनाड नसता, उत्तम गतीने रथ जाई |
सुखे जीवात्मा कैवल्याच्या, जाई निवासी लवलाही || १२३.

बुद्धीला जरि विवेक नसता, आणि इंद्रिये स्वैर अशी |
लगाम सुटता, ते हातीचे, अवनतीविण ती गती कैशी ?|| १२४.

रथात ऐशा बसे जीवात्मा, पूर्ण गुलामी मायेची |
चक्री संसाराच्या फिरवी, वार्ता नाही मुक्तीची || १२५.

मनी असावा संयम पुरता, विवेक बुद्धीत मुरलेला |
अश्व नियंत्रित, असता रथ तो, नित्य जात सन्मार्गाला || १२६.

दुर्लभ ऐशा नरजन्मी या, विवेक आणि वैराग्ये |
कल्याणचि हो अशा जीवाचे, लाभे, श्रीहरी तो भाग्ये || १२७.

भाग्यवान जो जीव असा तो, कार्ये करि जरि देहाची |
कर्मी न गुंते, सदा विरागी, साथ न सोडी विवेकाची || १२८.

त्याशी चुकल्या या भवफेऱ्या, जन्म मरण त्या कदा नसे |
शुद्ध ब्रह्मी तो विलीन झाला, इहलोकी येणे कैसे ? || १२९.

देह, विषय नि भोगहि सारे, क्षणिक नि नश्वर दुखदायी |
नचिकेता या कधी न भुलावे, सारे केवळ मायावी || १३०.

विषय इन्द्रियाहुनी बलशाली, बलिष्ठ त्याहून मनचि परी |
मनाहुनि बलशाली बुद्धी, म्हणुनि विवेकी बुद्धी करी || १३१.

या साऱ्याहुनि श्रेष्ठ जीवात्मा, त्याहुनिही बलवान असे |
आत्मशक्तीला पुरे अनुभवी, तरीच दृष्टीस ब्रह्म दिसे || १३२.

अव्यक्तचि जी त्रिगुणी माया, सदा जीवाला भुलवितसे |
अति दुस्तर ती रे नचिकेता, दूर हरीला ठेवितसे || १३३.

प्रलोभने नि मोहजालचि, जीवहि विसरे स्वरूपाला |
विवेक सुटता, तो अंतरीचा, दूर ठेवी ती ब्रह्माला || १३४.

क्षुद्र भोग ते विषयांचे जरि, विरक्तासी अनासक्ती |
सर्वश्रेष्ठ हरी नित्य चिंतिता, मायेची दुबळी शक्ती || १३५.

शरण हरीला जाता जीवन, सारेची ते सुलभ असे |
तोचि देतसे योग्य प्रेरणा, जगती वर्तावे कैसे ?|| १३६.

हृदयमंदिरी हरी सकलांच्या, गुप्त रूपाने नित्य वसे |
होता त्याची नित अनुभूती, भक्ता चिंता कांही नसे || १३७.

विषय सर्वही नीट निरखुनी, वळवावे अंतर्यामी |
मनात त्यांना विलीन करिता, होईल त्यांचा तो स्वामी || १३८.

बुद्धी व्हावी ज्ञानस्वरुपा, विलीन तीतचि मन व्हावे |
आता सारे निर्णय निश्चय, केवळ बुद्धीने घ्यावे. || १३९.

क्रिया कदापि मने न करणे, सारे निर्णय बुद्धीचे |
ऐसी बुद्धी पूर्ण विवेकी, होता राज्य विवेकाचे || १४०.

हे सारे परि सहजची व्हावे, वळण इंद्रिया लागावे |
त्याज्य सहजी ते टाळू लागता, हरीशी तल्लीन ते व्हावे || १४१.

सारे कांही तया समर्पण, निरिच्छ आपण ते व्हावे |
करणे किंवा नाही करणे, हे हरीनेची ठरवावे || १४२.

असे समर्पण सहजी होता, द्वार उघडते ब्रह्माचे |
जीवन होते सारे हरिमय, उमगे सारे हे त्याचे || १४३.

दुर्लभ हा नरदेह लाभला, क्षण क्षण कारणी लागावा |
श्रेयस्कर ते सहजी आवडो, कुसंग नित्यचि टाळावा || १४४.

कितिक जन्मीच्या कितीक योनी, भोग भोगिले ते नाना |
दैवे हा नरजन्म लाभला, टाळी भौतिक मोहांना || १४५.

अरे पशुही, विषायानंदि, विवेक त्यासी परि नाही |
भोगा त्यागी, ओळख निजरूप, प्रेयस अनुसरी लवलाही || १४६.

ऊठ-ऊठ तूं झणी मानवा, निद्रा सोडी मोहाची |
सावधान हो, करि सत्संगा, वाट जाण कैवल्याची || १४७.

पैल तिराला जेही पोचले, ऐशा सिद्धांचेपाशी |
विनम्र होऊनि करी प्रार्थना, सांगा आत्मज्ञानाशी || १४८.

अनुभव अमृत ज्यांनी प्राशिले, पूज्य असे जे सिद्ध कुणी |
श्रवण कराया करी प्रार्थना, तया कृपेने हो ज्ञानी || १४९.

इंद्रीयांचिया असे पैल ते, परतत्व जंव ये हाता |
चिरंजीव तुज ते ज्ञानामृत, खचितचि बनविल नचिकेता || १५०.

नित्य प्राप्त ते आत्मतत्व रे, पडदा हटवी मायेचा |
आनंदमय नि नित्य सौख्यमय अनुभव घेई शांतीचा || १५१.

शब्दरहित नि स्पर्शरहितहि, नसे रूपहि कांही तया |
अनंत, शाश्वत, नसे गंध वा, नसेची रस ही असे जया || १५२.

इंद्रिये न मन, बुद्धी त्यासी, शके न जाणू नचिकेता |
त्याची सत्ता सर्वव्यापी ती, तो एकचि पालनकर्ता || १५३.

असा अनादि परमात्मा जो, जीवाहूनहि श्रेष्ठ असे |
त्यासी पुरते जाणून घेता, जन्म-मरण ते कदा नसे || १५४.

गुह्य हेही जे नचिकेताला, यमदेवाने सांगितले |
सारे वर्णन ऐकुनी, वाचुनी, आणि अंतरी चिंतीयले || १५५.

सावधान नि शुद्ध मनाने, मुमुक्षूस ही कथियेले |
ब्रह्मपदी त्या होई प्रतिष्ठा, जीवन सार्थकचि झाले || १५६.

ज्ञान गुह्य हे अतीव श्रेष्ठचि पात्र ब्राह्मणा सांगावे |
त्या अनुसरुनी, करी उन्नती, परम पदाला तो पावे || १५७.

**प्रथम अध्याय- तृतीय वल्ली समाप्त** {०१/०४/२१}

## द्वितीय अध्याय – प्रथम वल्ली

बहिर्मुख ती सर्व इंद्रिये, स्पर्शिताती ती विषयांना |
तयासि अंतर्मुखचि वळवी, सोड क्षणिक त्या भोगांना || १५८.

विषय स्पर्शितील, परि न गुंततील, असे वळण लावी त्यांना |
श्रेयस्करचि आशय सेवुनी, देतील जाणीव तशी मना || १५९.

निसर्ग करि त्या, बाह्यमुखीचि, जीवनी शुभची होण्याला |
जेणे मन सोपवी बुद्धीला, कर्मे विवेकी करण्याला || १६०.
इंद्रिये न अंतर्मुख होता, वृत्ती धावती बाहेरी |
विरळा जनचि कुणी जाणती, हृदयासनी जो असे हरी || १६१.

बाह्यबुद्धीचे बाल्यवृत्ती जन, विषयभोगी रमुनी जाती |
सहजी विषयानंदी गुंतती, मृत्यूचे सावज होती || १६२,

जेही विवेकी, हितकर मार्गे, नित्यचि अंतर्मुख होती |
तया आवडे शुद्ध भक्ती ती, हरिलाचि ते अनुभविती || १६३.

देह, बुद्धि, मन नसेचि माझे, केवळ मी उर्जा दाता |
मी हरीचा नि हरीहि माझा, चरणी ठेवियला माथा || १६४.

क्षणिक भोगचि ते विषयांचे, अवनतीला ते घडविती |
देहा त्याचे कार्य करू दे, भगवंती मम शरणगती || १६५.

अनासक्तचि बुद्धिमंत ते, विषय चिखली त्या ना प्रीति |
अमृताचीचि ओढ जयाला, कैसी होईल आसक्ती ?|| १६६.

आसक्तीचि कारण होते, करण्या भवचक्री फेरे |
जन्म-मरण ते दूर तयाला, तुच्छ हरीविना त्या सारे || १६७.

शाश्वत वैभव, सुखानुभूती, नित्य वास हरीच्या ठायी |
कदा नावडे भोगासक्ती, प्रेयस आवड ती नाही || १६८.

जेही लाभते या इहलोकी, कधि न कधी सोडून जाती |
परम सत्य ते नित्यचि शाश्वत, करि त्यावरीचि तूं प्रीति || १६९.

जयाचियाचि अनुग्रहाने, आनंद मिळतो विषयांचा |
परि त्याचिया ज्ञान शक्तीने, उमगे पथ हा नरकाचा || १७०.

विवेक लाभे जया कृपेने, कळे काय ते त्यागावे |
तो पुरुषोत्तम जाणून घेणे, ज्ञान हेचि तुजलागी हवे || १७१.

ज्या प्रश्नाचे उत्तर मिळण्या, तुवा विनविले मज होते |
तोचि एकरस असे श्रीहरी, जाणुनि घे सर्वज्ञाते || १७२.

ब्रह्मतत्व ते अंतिम सत्यचि, जी सकलांची परमगती |
भाग्यवान तूं ओढ तयाची, निश्चित तुजला ती प्राप्ती || १७३.

त्याचे द्वारे, ये अनुभूती, स्वप्नी-जागृति नि भोगांची |
स्थितप्रज्ञ ते जाणुनि त्याला, वार्ता ना सुखदु:खाची || १७४.

अनुकूल, प्रतिकुल कांही घडेना, भक्त कदापि विचलित ना |
हरिचरणा तो कदा न सोडी, येवो विपत्ती त्या नाना || १७५.

माझ्या पाठी अनंत असता, क्षुद्र गोष्टी ना भिवविती |
दृढचि भावना असे तयाची, सुख-दुःखे येती जाती || १७६.

जसे कर्म ते तसेची फल ते, योजितसे श्री परमात्मा |
तो सकलांचा जीवनदाता, अंश तयाचा जीवात्मा || १७७.

ज्या प्रश्नाचे उत्तर मिळण्या, तुवा विनविले मज होते |
तोचि एकरस असे श्रीहरी, जाणुनि घे सर्वज्ञाते || १७८.

जयास उमगे सकल हरीमय, अतीत कालाच्याहि असे |
सकला ठायी त्या समबुद्धी, मित्र नि शत्रू कुणी नसे || १७९.

ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते |
तोचि एकरस असे श्रीहरी, जाणुनि घे सर्वज्ञाते || १८०.

भक्त सदा तो असेचि निर्भय, हृदय मंदिरी भगवंत |
त्याचा महिमा सदा आठवे, कदा न त्यासि रे खंत || १८१.

आपुल्या संकल्पेचि देहि करि, जीवात्म्यासह वासाते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || १८२.

पूर्वी पंचभुतांच्या योगे, हिरण्यगर्भाचिये रूपे |
हृदय मंदिरी तोचि वसतो, श्रीहरी जीवात्मारूपे || १८३.

सकला ठायी हृदयी वसे तो, सर्वव्यापी तो परमात्मा |
सारे जगची महिमा त्याचा, अंश तयाचा जीवात्मा || १८४.

ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते |
तोचि एकरस असे श्रीहरी, जाणुनि घे सर्वज्ञाते || १८५.

सर्वदेवतामयी भगवती, संकल्पाने श्री हरीच्या |
ती अदितीचि जीवनशक्ती, स्थायी प्राणिमात्रांच्या || १८६.

नसे भिन्न ती भगवंताहुनि, रुपचि हरीचे जाण तिते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || १८७.

काष्ठी जैशी गुप्त रूपाने, अग्निदेवता वसत असे |
वा मातेच्या उदरी पालन, गर्भ असे तो परि न दिसे || १८८.

तैसे हृदयी प्रत्येकाच्या, वसे हरी जाणे त्यांते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || १८९.

जया प्रभावे, उदय अस्तही, नित्य भानुचा होत असे |
आणि देवता, प्रवीष्ठ राहुनी, तया नियमने वर्ततसे || १९०.

नियमन आणि तये व्यवस्था, वर्तताती या ब्रह्मांडी |
अनुशासन त्याचेचि असे ते, कुणी मर्यादा ना तोडी || १९१.

सर्वश्रेष्ठ चि त्याचा महिमा, कुणी ना उल्लंघित त्यांते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || १९२.

इहलोका जे ब्रह्म व्यापिते, परलोकीही तेच असे |
जे न जाणती सकल हरीची, जन्म-मृत्यूच्या चक्री फसे || १९३.

ज्ञात्याने हे जाणुनि घ्यावे, सकला ठायी हरीचि वसे |
नर जन्मी हे ज्ञान होतसे, सुटती मायेचे फांसे || १९४.

उपाधीतल्या गुप्तरुपाचे, परमतत्व जाणुनि घ्यावे, |
अंतर्बाह्यही शुद्धचि होता, सहजी अनुभूति ती पावे || १९५.

नाना नामे रुपे जगती या, सर्वाठायी एक हरी |
अस्तित्वा त्या समरस होता, जन्म-मरण ते नित्य दुरी || १९६.

हृदयी अंगुष्ठाचि इतुका, तुवा अनुभवी श्रीहरीते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || १९७.

सारे उमगे हरीचि केवळ, मत्सर-निंदा नाचि करी |
तिरस्कार वा नसे कुबुद्धी, द्वेष कुणाचा मनी न धरी || १९८.

ज्ञान दृष्टीने ब्रह्म उमगते जाणुनी घेई तूं त्यांते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || १९९.

ब्रह्म असे अंगुष्ठमात्रचि, सकलांच्या हृदयस्थानी |
दिव्य ज्योती ती विना धुम्रचि, शाश्वत सकला व्यापोनी || २००.

नित्य शुद्ध नि कालातीतहि, जाण तया परब्रह्माते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || २०१.

वर्षाधारा गिरिशिखरावर, विविध रुपाने ओघळती |
प्रत्येकाचे रूप वेगळे, तरि केवळ जलची असती || २०२.

परि वर्षाजल शुद्ध जलाशयी, मिळता सहजी समरसते |
ना विकार ना तया विविधता, तैसा जाणी ब्रह्माते || २०३.

तसे ब्रह्म घे विविध उपाधी, परी एकचि नित्य असे |
द्वैत रूपे हे विश्व पाहता, हरीशी जाणशील कैसे ?|| २०४.

अद्वैताच्या लिला चालती, द्वैतरुपाने ते भासे |
अनुभवि द्वैती अद्वैताते, स्वये तेचि तूं होत असे || २०५.

अशी एकरस अनुभूती ज्या, सहजी हरीशी तद्रूपता |
होई तो सर्वज्ञ सदाचि परब्रह्म स्वये होता || २०६.

प्रथम वल्ली समाप्त

०५/०४/२१

## द्वितीय वल्ली

नाक कान मुख लोचन शिश्न नि, ब्रह्मरंध्र नाभीही तशी |
गुदा,असे अकरा दरवाजे, असती या नरदेहाशी || २०७.

या नगरीच्या आंत पहुडला, अनंत ऐसा भगवंत |
सर्वव्यापी नि ज्ञानस्वरूपी, आदि अनादि ना अंत || २०८.

नित्य तया नचिकेता स्मरुनी, नि:संगे करि कार्याते ||
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || २०९.

शरणागती ती पूर्ण हरीप्रति, निजहृदयी त्या वंदावे |
सुटता संसाराचे बंधन, नित्य मुक्तचि ते व्हावे || २१०.

अंतरिक्षी वसु विचरण करि तो, अतिथी या नगरी आला |
ज्योतिर्मय अग्नी, तो यज्ञी, ‘होता’ तोचि हवनाला || २११.

जल पृथ्वी नि आकाशासह, साऱ्या सृष्टीस व्यापतसे |
तोचि श्रीहरी परम तत्वचि, श्रेष्ठ त्याहुनि कुणी नसे || २१२.

अस्तिवाचा तोचि दाता, सकल शरीरी तोचि वसे |
तूंही ना त्याहुनि वेगळा, जो जाणे तो मुक्त असे || २१३.

प्राणाला करि ऊर्ध्वगामी नि, अपानासी अधोगामी |
मध्यावरती स्वये बैसतो, देव-देवता त्याज नमी ||२१४.

जीवात्मा या लोकी येई, साधन त्याला देहाचे |
मृत्यू होता, जीर्ण शरीरा, टाकुनि कार्य करी पुढचे || २१५.

पंचभुतांनी देह बनविला, जीवाच्या कार्यासाठी |
देह त्यागिता, पुरते विघटन, होई जीवाचे पाठी || २१६.

जीवनी जीही केली कर्मे, त्यांची फळे ती भोगाया |
नवीन कार्यास्तव जीवात्मा, घेत असे दुसरी काया || २१७.

जीव नि देह हि विभक्त होता, वेगवेगळ्या त्या वाटा |
हेच जाणणे तुजला होते, पुरविन मी तंव उत्कंठा || २१८.

जीवन शक्ती न प्राण अपाने, आश्रय त्यांना जीवाचा |
जीवची जगवी या देहाला, नच संबंधहि इतरांचा || २१९.
लोहचुंबकाच्या अस्तित्वे, जैसे सहजी लोह चळे |
चैतन्यचि जो असे जीवात्मा, त्या संपर्के शक्ती मिळे || २२०.

देह सोडिता, प्रारब्धाला, जीव संगती नेत असे |
जेही पेरिले मागील जन्मी, उदंड फळ त्यासि तैसे || २२१.

ते भोगाया नवीन काया, मानव पशु वा अन्याची |
देह सोडिता, जैसी मति ती, तैसी व्यवस्था भोगाची || २२२.

पूर्ण न्यायी तो परमेश्वरचि, आश्रय देई सकलाते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || २२३.

जैसा अग्नि गुप्त रूपाने, ब्रह्मांडी या नित्य वसे |
ज्यास स्पर्शी तो त्याच रूपाने, व्यक्त जाहल्या वरी दिसे || २२४.

तैसा ईश्वर सकलाठायी, देही विचरता, तसा दिसे |
परि अलिप्त तो, कार्यामधुनी, कार्य संपता जात असे || २२५.

एकचि वायू चराचरी या, सकल देही तो खेळतसे |
जयाशी स्पर्शे, त्याच रूपाने, कार्यचालना देत असे || २२६.

किंवा भास्कर नभात येता, प्रकाश देई जगताला |
कार्ये सकलही करिती आपुली, भास्कर लिप्त नसे त्याला || २२७.

सकलांचे अंतरी परमात्मा, देह चालवी चैतन्ये |
त्याचे अस्तित्वाशी उमगुनी, भक्त उमगती त्या ज्ञाने || २२८.

तो पुरुषोत्तम अनुभुत ज्यासी, सकलाठायी तोचि दिसे |
लाभे त्यासिची नीरव शांती, कृतार्थ जीवन होत असे || २२९.

भाग्यवानची तो नचिकेता, प्रभूचा महिमा ज्यासी कळे |
मूर्तिमंत आनंद नि शांती, बुद्धी मनाला जो नकळे || २३०.

सकल सुखांचे आगर जोकी, कैसा अनुभुत तो होई |
उत्कंठा समजे यमदेवा, सांगे त्यासी लवलाही || २३१.

ऐक बालका, भगवंताला, चंद्र रवी ना प्रगट करी |
प्रकाशमय तो असे स्वयंभू, जगता आश्रय एक हरी || २३२.

चंद्र सूर्य वा अन्यही ज्योती, अंशे एका झगमगती |
अन्य कुणी त्या करि न प्रकाशित, विश्वा आश्रय तो जगती || २३३.

## तृतीय वल्ली

वरी मूळ नि खाली शाखा, वृक्ष असा अश्वत्थ असे |
तेचि सनातन जगत असे हे, अनादि वृक्षासम भासे || २३४.

अमृतमय जे ब्रह्म तत्व ते, मूलाधारचि जगताते |
ज्ञान जयाचे होण्यास्तवचि, तुवा विनविले मज होते || २३५.

परब्रह्म परमेश्वर त्यातुनि, सृजन होतसे वृक्षाचे |
त्या आधारे विहरति सारे, नियमन पाळिती ते त्याचे || २३६.

परब्रह्माचे हाती उभविल्या, वज्र असे नित नियमांचे |
जैसी करणी, तैसी भरणी, सकला भयचि असे त्याचे || २३७.

जगी जे विहरे, लय तयातचि, जळात खेळे जळ जैसे |
निज स्वरूपी जो तया जाणतो, चिरंजीव तो होत असे || २३८.

सूर्य अग्नि वायू नि इंद्रही, आपआपले कार्य करी |
त्याच्या नियमे मृत्युदेवही, शरीराते त्या संहारी || २३९.

आपआपली करिती कामे, धावत वेगे नित वेळी |
भगवंताचे अमोघ शासन, नियमाने सारी खेळी || २४०.

आपुले जीवनकाली जयाने, निजरूप हरीचे ओळखिले |
सफल जाहले जीवन त्याचे, बंधन त्याचे नित सुटले || २४१.

तया जाणता, त्यांत विलिनचि, अमरत्वाचा लाभ तया |
परि अन्यथा, जन्म मृत्युच्या, चक्री खेळवीते माया || २४२.

विशुद्ध ऐशा अंतःकरणी, स्पष्टचि दर्शन निजरूपाचे |
निर्मल दर्पणी यथातथ्यचि, स्वरूप जैसे द्रष्ट्याचे || २४३.

देह सोडिता, पितृलोकी त्या, दर्शन स्वप्नासमचि असे |
जीव वासनेमाजी तदा तो, संस्कारासम म्हणुनि दिसे || २४४.

पूर्ण मुक्त ना भोगापासुनी, असा लोक जो गंधर्व |
अस्थिर जैसे बिंब जळीचे, दिसे रूप ते जरि सर्व || २४५.

म्हणुनि देही असता आत्मा, विषय त्यागिता शुद्ध मने |
अनुभव येई स्वये ब्रह्म मी, प्रतीत होई तो सुमने || २४६.

अध्यात्मि ती जैशी प्रगती, विषयस्पर्शि तैसी वृत्ती |
ज्ञानी पुरुषा शोक मोह ना, पुरती मिटता आसक्ती || २४७.

विषयस्पर्श ना करिती विचलित, अलिप्त त्याहुनि तो साक्षी |
त्यांची ये-जा नच भंगेचि, केवळ आत्मरूप लक्षी || २४८.

जाणे प्रकृतीचेची खेळ हे, नि:संगा ना ये बाधा |
शुद्ध मने तो हरीत विरता, प्रतीति हरिमयचि सदा || २४९.

इंद्रियाहुनी श्रेष्ठ असे मन, त्याहुनी बुद्धी श्रेष्ठ असे |
श्रेष्ठ तिच्याहुनी असे जीवात्मा, परि माया त्या बांधितसे || २५०.

माया शक्ति ती अव्यक्ता, भगवंताची दुस्तर ती |
बंधन मायेचे ते टळण्याला, पूर्ण हरिपदी शरणगती || २५१.

अनन्य भक्ति, अनन्य आश्रय, समर्पित त्या मन बुद्धी |
त्यासी जीवन पूर्ण अर्पिता, मिळते गंगा जशी जलधी || २५२.

अमृत स्वरूपी परमानंदी, ब्रह्म होत तो जीवात्मा |
अन्य कुणी ना श्रेष्ठ त्याहुनी, सर्वव्यापी तो परमात्मा || २५३.

विषय इंद्रियांचा न असे तो, म्हणुनी तयाचे ना दिसणे |
हृदयस्थानी विषय विसरुनी, ज्ञानचक्षुने अनुभवणे || २५४.

अनुभविता तो अनुभवणारा, त्यांतचि विरता नच उरतो |
गंगा मिळता जशी सागरा, वेगळेपणा तो सरतो || २५५.

मन आणि पांचही इंद्रिये, बुद्धिसहित ते स्थिर होती |
तदाकारीता ब्रह्म समीप ने, श्रेष्ठचि ही जरि योगस्थिती || २५६.

परि नसे ही कदापि शाश्वत, कधीतरी ही संपतसे |
म्हणुनी तिच्याही पैल जाऊनी, भक्त स्वये हरी होत असे || २५७.

नचिकेता, ती ब्राह्मीस्थितीचि, जेथुनी परतुनि ना येणे ||
सदा दंग तो परमानंदी, खुंटलेचि जाणे येणे || २५८.

तो परमात्मा शब्दि न गंवसे, नेत्रांना तो दिसत नसे |
मनापलिकडे त्याचे असणे, दुजेपण न त्या साहतसे || २५९.

आपुले अस्तित्वा त्या समरसणे, वेगळेपणा विरवोनी |
हरी होऊनि हरीशी भजणे, द्वैतचि पुरते त्यागूनी || २६०.

माझे म्हणुनी कांही नुरावे, अनुभवी हरीला सारीकडे |
अनन्यताचि त्याची प्राप्ती, सबाह्य अंतरी चोहीकडे || २६१.

नित्य प्राप्त तो, नलगे साधन, अनुभव हीचि हरिप्राप्ती |
निजअस्तित्वी त्या अनुभवणे, ही नचिकेता ब्राह्मीस्थिती || २६२.

परब्रह्म मी पुरती जाणीव, आपुले आपणा ओळखणे |
अनुभूती येता, जाणीव-नेणीव, सरती, उरे केवळ असणे || २६३.

प्रत्यक्षचि त्याची ही प्रचीति, हरी होऊनिया हरी भजणे |
निजस्वरूपी त्यासी अनुभवणे, स्वानंदी रमुनी जाणे || २६४.

हीचि अनुभूती दिव्यत्वाची, कांही न करणे मग उरते |
निराकार नि निर्गुण निश्चल, असीम भावे अद्वैते || २६५.

समभावाची एक सुषुम्ना, प्राण-अपाना समचि करी |
चिदाकाशहि बाह्याकाशी, मूळ रूपे ये माघारी || २६६.

ऐसे विरता, एक-दुजेपण, जलात जलचि समरसता |
ना तरंग वा लहरी लाटा, द्वैत भाव तो ना उरता || २६७.

हृदयमंदिरी त्या अनुभवणे, अंगुष्ठासम ती ज्योती |
तिचिया तेजी एकरूपाने, दिव्यत्त्वाची नित प्रतीति || २६८.

पवित्र आणि श्रेष्ठ ज्ञान हे, नचिकेताने ऐकियले |
यमदेवाने यथार्थ कथिले, कृतार्थ जीवन ते झाले || २६९.


नचिकेताने करिता श्रवणा, परमशुद्धी ती अनुभविली |
अहंभाव तो पुरता विरला, ये-जा भ्रांती ती मिटली || २७०.

नसता जन्म नि मरणहि नुरले, देहभावहि नच उरला |
एकरूप ब्रह्माशी होता, स्वानंदी रंगुनी गेला || २७१.

जोही ज्ञान हे जीवनी आचरे, विषय-विकारांना विसरे |
जीवन त्याचे सफलचि होई, भवसिंधुतुनि पूर्ण तरे || २७२.

|| हरी ॐ ||

- अण्णा {गुढीपाडवा. १३/०४/२०२१}
नाशिक-पंचवटी




अण्णा (श्री. मधुकर सोनवणे) यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके क्लिक/टॅप करताच उघडतील

